दिन विशेष...
* 'मराठा' या इंग्रजी दैनिकाची सुरुवात
१८८५ : पुणे येथे फर्ग्युसन कॉलेज सुरु.
१९४४ : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा स्मृतिदिन.
१९४३ : क्रांतिकारक भाई कोतवाल यांना हौतात्म्य लाभले.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८५,१८८.६० -३२.००(०.०३८%)
डॉलर ₹ ८९.९९

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | २८ | १५ |
| दिल्ली | १७ | ११ |
| मुंबई | ३१ | १९ |
| नागपूर | २८ | १४ |
| पुणे | २९ | १० |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. २ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ५४ | किंमत : ५ रु. | पाने ४

### सुविचार
स्वतःवर विश्वास ठेवा; तुमचं ध्येय गाठण्यासाठी तेच तुमची ताकद आहे.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०५ संध्या-५:५८

### सोने – चांदी
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,३७,१७५/- २,३८,०००/-

### केळी भाव
नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

## कल्याण- डोंबवलीत ९ , जळगाव ३ , धुळे ३, अहिल्यानगर २, पनवेल १, भिवंडी १

# राज्यात महायुतीचे १९ उमेदवार बिनविरोध

## जळगावात शिंदेसेनेची तर धुळ्यात भाजपाची बिनविरोध निवडीची हॅट्ट्रिक

वृत्तसंस्था । मुंबई

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत मतदानापूर्वीच महायुतीने मोठी मुसंडी मारली आहे. कल्याण-डोंबिवली, भिवंडी, पनवेल आणि धुळ्यापाठोपाठ आता जळगाव व अहिल्यानगरमध्येही भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी विजयाचे खाते उघडले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेत विरोधकांनी माघार घेतल्याने अनेक जागांवर महायुतीचे १९ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. या यशामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून ठिकठिकाणी फटाक्यांच्या आतषबाजीत जल्लोष साजरा केला जात आहे.

**अहिल्यानगरमध्ये दोन बिनविरोध**

अहिल्यानगर महापालिका निवडणुकीत आज माघारीच्या पहिल्याच दिवशी इतिहास घडला. पालिकेत महायुतीचे राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या दोन जागा बिनविरोध निवडून आल्या.

**भिवंडी–पनवेल पालिकेत प्रत्येकी एक उमेदवार विजयी**

भिवंडी- पनवेल पालिकेत भाजपाची प्रत्येकी एक जागा विजयी झाली. त्यामुळे भाजपासह संपूर्ण महायुतीचे राज्यात तब्बल २० उमेदवार आतापर्यंत बिनविरोध आले आहेत.. त्यामुळे राज्यात भाजप महायुतीचे सरकार असेल असे बोलले जात आहे

### ➤ कल्याण-डोंबिवलीत 'नऊ' बिनविरोध

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत महायुतीने विरोधकांना मोठा धक्का दिला आहे. १२२ सदस्य संख्या असलेल्या या पालिकेत तब्बल ९ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यामध्ये शिवसेनेचे (शिंदे गट) ३ आणि भाजपचे ६ उमेदवार विजयी झाले आहेत. प्रभाग क्रमांक २४ आणि २६ मध्ये महायुतीने एकतर्फी विजय मिळवत आपली ताकद सिद्ध केली आहे.

### ➤ धुळे महापालिकेत भाजपाची हॅट्ट्रिक

धुळे महानगरपालिकेत माघारीच्या पहिल्याच दिवशी भाजपाच्या तीन महिला उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी फटाक्यांच्या आतषबाजीसह गुलाल उधळला.

प्रतिनिधी । जळगाव

**शहर महानगरपालिका निवडणुकीत शिंदेसेनेने जोरदार सुरुवात करत बिनविरोध विजयांची हॅट्ट्रिक साधली आहे. माघारीच्या पहिल्याच दिवशी दिवसभरात शिवसेनेचे तीन उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. प्रभाग १८ अ मधून शिवसेनेचे डॉ. गौरव चंद्रकांत सोनवणे, प्रभाग ९ अ मधून शिवसेनेचेच मनोज सुरेश चौधरी व प्रभाग क्रमांक ९ ब मधून शिवसेनेच्या प्रतिभा गजानन देशमुख यांची बिनविरोध निवड निश्चित झाल्याने शिवसेनेचा विजयाचा आलेख अधिकच भक्कम झाला आहे.**







महानगरपालिका निवडणुकीच्या छाळणी प्रक्रियेत वैशाली पाटील यांचा अर्ज बाद ठरल्याने बुधवारी सायंकाळी भाजपच्या उज्ज्वला बेंडाळे यांच्या बिनविरोध निवडीने सुरुवात झाली. त्यानंतर गुरुवारी माघारीच्या पहिल्याच दिवशी सकाळी प्रभाग १८ अ मधून शिवसेनेचे डॉ. गौरव चंद्रकांत सोनवणे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली.

**● प्रभाग १८ अ मधून शिवसेनेचे डॉ. गौरव चंद्रकांत सोनवणे यांच्या विरोधात अपक्ष उमेदवार मयूर चंद्रशेखर सोनवणे यांनी आपला अर्ज दाखल केला होता. परंतु माघारीच्या पहिल्याच दिवशी त्यांनी माघार घेतल्याने डॉ. सोनवणे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली.**

गौरव सोनवणे हे आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे व माजी आमदार लताताई सोनवणे यांचे पुत्र आहेत. त्याच दिवशी दुपारी प्रभाग ९ अ मधून शिवसेनेचेच मनोज सुरेश चौधरी बिनविरोध निवडून आले. यामुळे शिवसेनेचा उत्साह वाढलेला असतानाच सायंकाळी प्रभाग ९ ब मधून प्रतिभा गजानन देशमुख यांच्या बिनविरोध निवडीने शिवसेनेची दिवसभरात हॅट्ट्रिक पूर्ण झाली.

दुपारी प्रभाग ९ ब साठी शिवसेनेने प्रतिभा गजानन देशमुख यांना अधिकृत उमेदवारी दिली होती. त्यांच्या विरोधात अपक्ष उमेदवार प्रतिभा सुधीर पाटील या निवडणूक रिंगणात होत्या. मात्र पहिल्याच दिवशी दुपारी त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने प्रतिभा देशमुख यांच्या बिनविरोध निवडीचे चित्र स्पष्ट झाले. प्रभाग ९ अ मधून शिवसेनेचेच मनोज सुरेश चौधरीही बिनविरोध निवडून आले. डॉ.गौरव सोनवणे, मनोज चौधरी व प्रतिभा देशमुख (पान २ वर)

### थोडक्यात



**नववर्षाच्या पहिल्याच दिवशी मार्शचा धमाका!**

**दिल्ली ।** क्रिकेट चाहत्यांसाठी नवीन वर्षाची सुरुवात अत्यंत धमाकेदार झाली आहे. ऑस्ट्रेलियाचा टी-२० कर्णधार मिचेल मार्शने बिग बॅश लीग (बीबीएल) २०२५-२६ मध्ये होबार्ट हरिकेन्सविरुद्ध खेळताना एक अविस्मरणीय शतक झळकावले आहे. विशेष म्हणजे, टी-२० वर्ल्ड कप २०२६ साठी ऑस्ट्रेलियन संघाचा कर्णधार म्हणून घोषणा झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच मार्शने ही तुफानी खेळी केली.



**मुंबई-अहमदाबाद अंतर केवळ २ तासात होणार पूर्ण**

**नवी दिल्ली ।** भारतीय रेल्वेच्या इतिहासात मैलाचा दगड ठरणाऱ्या बुलेट ट्रेन प्रकल्पाची प्रतीक्षा आता संपली आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी गुरुवारी एका विशेष कार्यक्रमात देशातील पहिल्या बुलेट ट्रेनच्या व्यावसायिक प्रवासाची तारीख जाहीर केली. येत्या १५ ऑगस्ट २०२७ रोजी भारताची पहिली बुलेट ट्रेन रुळावरून धावेल, अशी अधिकृत घोषणा त्यांनी मीडियाशी संवाद साधताना केली. अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेन प्रकल्पाचा हा पहिला टप्पा असून, सुरुवातीला ही सेवा गुजरातच्या सूरत ते बिलिमोरा या दोन स्थानकांदरम्यान सुरू होणार आहे.

## अहिल्यानगरातून मनसेचे दोन उमेदवार बेपत्ता, अपहरणाचा संशय

वृत्तसंस्था । अहिल्यानगर

**अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीत खळबळजनक प्रकार समोर आला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून रिंगणात उतरलेले दोन उमेदवार अचानक बेपत्ता झाल्याने राजकीय वर्तुळात एकच खडबड उडाली आहे. गेल्या चोवीस तासांपासून उमेदवारांचा कुटुंबीयांशी कोणताही संपर्क नसल्याची माहिती मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ आणि सुमित वर्मा यांनी दिली आहे. बेपत्ता झाल्याच्या या घटनेने केडगाव परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.**



केडगाव भाग संवेदनशील मानला जात असल्याने निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठीच उमेदवारांचे अपहरण करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. हा गंभीर आरोप विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष सुमित वर्मा यांनी केला आहे. विशेष म्हणजे, बेपत्ता झालेल्या दोन्ही उमेदवारांपैकी एक उमेदवार भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांविरोधात, तर दुसरा उमेदवार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या (पान २ वर)

**प्रभाग क्रमांक १७ मधील राहुल जाधव आणि अंबरनाथ भालसिंग अशी बेपत्ता झालेल्या उमेदवारांची नावे आहेत. त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेनंतर मनसेचे पदाधिकारी थेट कोतवाली पोलीस ठाण्यामध्ये दाखल झाले. पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेऊन तातडीने सखोल तपास करण्याची मागणी करण्यात आली आहे.**

## सामाजिक न्याय विभागाचे महामंडळ आर्थिक अडचणीत

वृत्तसंस्था । नागपूर

राज्य शासनाने महामंडळांसाठी ६०० कोटींची शासन हमी दिली असली तरी सुमारे २५० कोटींची रक्कम अद्याप प्राप्त झाली नाही. त्यामुळे दिल्लीस्थित राष्ट्रीय आर्थिक विकास महामंडळांनी पुढील निधी देण्यास नकार दिला असून सामाजिक न्याय विभागाच्या कर्ज व स्वयंरोजगार योजनांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (एनएसएफडीसी) तसेच राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ (एनएसकेएफडीसी) या दोन महत्त्वाच्या आर्थिक विकास महामंडळांच्या माध्यमातून राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत महामंडळांना अल्प व्याजदरात कर्जपुरवठा केला जातो. एनएसएफडीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळास २.५ ते ४ टक्के दराने कर्ज दिले जाते, तर एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्या नियमानुसार संबंधित महामंडळांना २ ते ४.५ टक्के दराने कर्जपुरवठा करण्यात येतो.

ही केंद्र शासनाची महामंडळे 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर कार्यरत असून राज्यातील अनुसूचित जाती, नवबौद्ध व सफाई कर्मचारी, समाजातील दुर्बल व वंचित घटकांच्या आर्थिक प्रगतीसाठी खेळत्या भांडवलाच्या स्वरूपात निधी उपलब्ध करून देतात. मात्र, सध्या या कर्जपुरवठ्याबाबत मोठी अडचण निर्माण झाली आहे. राज्य शासनाने या महामंडळांसाठी सुमारे ६०० कोटी रुपयांची शासन हमी दिलेली असतानाही, यापूर्वीची सुमारे २५० कोटींची थकीत रक्कम अद्याप मिळाली नाही.

या रकमेचा प्रश्न मार्गी न लागल्याने दिल्लीस्थित राष्ट्रीय आर्थिक विकास महामंडळांकडून पुढील निधी उपलब्ध करून देण्यास केंद्र शासनाने स्पष्ट नकार दिला आहे. याचा थेट परिणाम राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या विविध कर्ज योजना, स्वयंरोजगार योजना, तसेच इतर कार्यक्रमांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अनेक लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित राहण्याची भीती असून, नव्या कर्जवाटपावरही मर्यादा येण्याची शक्यता आहे.यापूर्वी सन २०१९ मध्ये पाच वर्षांसाठी शासन हमी देण्यात आली होती. ती मुदत २०२४ मध्ये संपुष्टात आल्याने पुढील पाच वर्षांसाठी नव्याने या तीनही महामंडळांना मिळून ७५० कोटींची शासन हमी देण्यात आल्याची (पान २ वर)

## नववर्षाच्या पहिल्याच दिवशी गॅस सिलिंडर १११ रुपयांनी महागले

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

केंद्र सरकारने वाणिज्य वापराच्या एलपीजीचे दर सिलिंडरमागे १११ रुपयांनी वाढवण्याची गुरुवारी घोषणा केली. तर विमानाचे इंधन म्हणून प्रचलित एव्हिएशन टर्बाइन फ्युएलमध्ये (एटीएफ) दर किलो लिटरमागे ७,३५३.७५ रुपयांनी म्हणजेच ७.३ टक्क्यांची गुरुवारी कपात करण्यात आली. तेल कंपन्यांनी वाणिज्य एलपीजीच्या किमतीत १११ रुपयांनी वाढ केल्याने १९ किलोग्रॅमच्या सिलिंडरची किंमत १,६९१.५० रुपये (दिल्ली) झाली आहे. मुंबईत वाणिज्य एलपीजीची (पान २ वर)

## आसाम ठरले ८ वा वेतन आयोग स्थापणारे पहिले राज्य

वृत्तसंस्था । गुवाहाटी

केंद्र सरकारनंतर कर्मचाऱ्यांच्या वेतन रचनेत सुधारणा करण्यासाठी आठवा वेतन आयोग स्थापन करणारे आसाम हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे, अशी घोषणा



मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी गुरुवारी केली. राज्याचा आठवा वेतन आयोग माजी अतिरिक्त मुख्य सचिव सुभाष दास यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येणार असल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

केंद्र सरकारने आधीच आठवा वेतन (पान २ वर)

# यावल पोलिसात दाखल जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस

## १३ लाखांच्या रोकडसह तीन आरोपी अटकेत; दोघे फरार

प्रतिनिधी । यावल

**यावल पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या जबरी चोरीच्या गंभीर गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश करत चोरीस गेलेली तब्बल १३ लाख रुपयांची रोकड हस्तगत केली आहे. या कारवाईत तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, धुळे शहरातील आझादनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार बाहील शहा व त्याचा एक साथीदार सध्या फरार आहेत.**



या प्रकरणी यावल पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४७९/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ४ (ब), ५१३, १२६(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अशोक नागरे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला कसून तपासाचे आदेश दिले होते. त्यानुसार भुसावळ, चोपडा व जळगाव परिसरात तपास पथके रवाना करण्यात आली. घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचे सखोल विश्लेषण, तांत्रिक तपास तसेच गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा माग काढला.तपासात पाच आरोपींनी संगनमताने हा गुन्हा केल्याचे स्पष्ट झाले असून त्यापैकी तिघांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये जुबेर खान हमीद खान (वय ३३, रा. चोपडा), शेख इस्माईल शेख (वय २५, रा. नळगाव) आणि इस्माईल खान और खान (वय २५, रा. हुडको, जळगाव) यांचा समावेश आहे. या तिघांकडून चोरीस गेलेली संपूर्ण १३ लाख रुपयांची रोकड हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.सदरची कारवाई पोलीस निरीक्षक राहुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेखर डोमा पाटील, मयूर निकम, राहुल राठोड, गौरव पाटील, मिलिंद नांदन यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे. यावल पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे परिसरातील गुन्हेगारांमध्ये खळबळ उडाली आहे.

**या गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार बाहील शहा हा धुळे शहरातील आझादनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर चोरी, जबरी चोरी व मंदिरफोडीचे नऊपेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. तो व त्याचा एक साथीदार सध्या फरार असून, त्यांच्या शोधासाठी स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली आहेत. लवकरच फरार आरोपींनाही अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.**

## शालेय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे १९ जानेवारीपासून बेमुदत कामबंद आंदोलन

वृत्तसंस्था । पुणे



**शालेय शिक्षण विभागीतील अधिकाऱ्यांच्या विना चौकशी व विनापरवानगी सुरू झालेल्या अटक सत्रामुळे सर्व अधिकारी प्रचंड दबावाखाली काम करत असून या कारवायांमुळे अधिकाऱ्यांचे मनोबलाचे खच्चीकरण होत असून कार्यालयीन कामकाजावर त्याचा विपरित परिणाम होत आहे.**

गृहविभागाने तात्काळ या बेलगाम सुरु असलेल्या अटक सत्रांचा फेरविचार करून, दोष सिद्ध होईपर्यंत अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याची स्पष्ट धोरणात्मक भूमिका जाहीर करावी अन्यथा अखिल महाराष्ट्र राज्य शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघटना येत्या १९ जानेवारीपासून बेमुदत कामबंद आंदोलन करणार आहे. शालेय शिक्षण विभागात विना चौकशी अटक सत्र व वेतन देयकांवर प्रतिस्वाक्षरी केली म्हणून अटक करण्याची कार्यवाही नागपूर विभागात (पान २ वर)

## संपादकीय

### इच्छुकांचा आक्रोश

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीच्या निमित्ताने उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी राज्यात सर्वत्र ज्या प्रकारचा आक्रोश पहायला मिळाला ते पाहता आपली लोकशाही परिपक्व झाली आहे का अजूनही बाल्यावस्थेत आहे याबाबत शंका यावी. आपण ज्या पक्षाचे दीर्घकाळ कार्यकर्ते होतो आणि आता नगरसेवक पदाचे तिकीट आपल्यालाच मिळेल अशी खात्री असणार्या अनेकांना संबंधित राजकीय पक्षांनी डावलल्याने अनेक इच्छुक उमेदवारांचा भ्रमनिरास झाला आणि त्यांचा आक्रोशही समोर आला. अनेक ठिकाणी महिला कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाले, काही ठिकाणी कार्यकर्त्यांनी वरिष्ठ नेत्यांच्या कार्यालयाची तोडफोड केली, अनेक ठिकाणी उमेदवारी न मिळाल्यामुळे काही इच्छुकांनी तातडीने पक्ष बदल करून दुसर्या पक्षातून उमेदवारी पदरात पाडून घेतली. शिस्तबद्ध राष्ट्रीय पक्ष म्हणून बोलबाला असलेला भारतीय जनता पक्षालाच या आक्रोशाचा सर्वात मोठा फटका बसल्याचे दिसून आले. ज्या इच्छुकांना उमेदवारी नाकारण्यात आली होती त्यांनी नेत्यांवर गंभीर स्वरूपाचे आरोपही केले आणि इतर पक्षातून भारतीय जनता पक्षामध्ये आलेल्या लोकांना जास्त प्राधान्य देण्यात आल्यामुळे आमच्यावर अन्याय झाला, अशा प्रकारची भावनाही व्यक्त करण्यात आली. राज्यातील महानगरपालिकांची निवडणूक दीर्घ कालावधीनंतर होत आहे. साहजिकच बदललेल्या राजकीय परिस्थितीमध्ये अनेकांच्या राजकीय महत्त्वाकांक्षाही वाढल्या होत्या. भारतीय जनता पक्ष किंवा महायुतीतील इतर घटक पक्षांची उमेदवारी आपल्याला मिळाली तर निवडणुकीत यशाची खात्री असल्याने आपण नगरसेवक होऊ शकतो, असे स्वप्न बाळगणार्या अनेकांच्या स्वप्नांचा भंग यानिमित्ताने झाला. मुळात राज्यात सत्तेवर असलेला भारतीय जनता पक्ष, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हे महायुतीमध्ये जरी एकत्र असले तरी महानगरपालिकांमध्ये मात्र अनेक ठिकाणी ते एकत्र लढत नाहीत. राज्यात तब्बल १४ ठिकाणी महायुती फिसकटली असल्याने कार्यकर्त्यांचा दबावही वाढत चालला आहे. भारतीय जनता पक्षासाठी भाकरी फिरवणे हा त्यांचा नेहमीचा विषय असला तरी अशी भाकरी फिरवल्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात चटका बसवणारी प्रतिक्रिया येईल अशी अपेक्षा भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी केली नसावी. इतर राजकीय पक्षातून भारतीय जनता पक्षामध्ये आलेल्या लोकांना प्राधान्य देण्यात येत आहे.

# भुसावळ-चित्तोडगड राष्ट्रीय महामार्गामुळे जळगाव ते अजमेरचे अंतर कमी होणार!

## • भुसावळ-चित्तोडगड अंतर १५० किलोमीटर होईल कमी




प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातून आधीच तब्बल पाच राष्ट्रीय महामार्ग जाणार आहेत. त्यानंतर आता भुसावळ–चित्तोडगड दरम्यान प्रस्तावित राष्ट्रीय महामार्गाची त्यात भर पडणार आहे. महाराष्ट्रातून राजस्थानात जाण्यासाठी सोयीच्या ठरणाऱ्या या महामार्गामुळे जळगाव ते अजमेरचे अंतर कमी होणार आहे. दळणवळण सुविधा वाढल्याने महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि राजस्थानातील कृषी व औद्योगिक विकासालाही चालना मिळणार आहे.**

जळगाव जिल्ह्यातून आधीच एनएच ५३ सुरत (गुजरात) ते पारादीप (ओडिशा), एनएच ७५३ एफ जळगाव ते दिगी पोर्ट, एनएच ७५३ जे जळगाव ते मनमाड, एनएच ७५३ एल इंदूर–हैदराबाद, एनएच ७५३ बी बऱ्हाणपूर ते अंकलेश्वर हे पाच महामार्ग जातात. भुसावळ–चित्तोडगड (३४७ सी) हा भुसावळ, पाल, खरगोन, धार, रतलाम, मंदसौर, नीमच, चित्तोडगड असा नवीन राष्ट्रीय महामार्ग असणार आहे. भीलवाडामार्गे पुढे पुष्कर आणि अजमेरला देखील तो जोडला जाणार आहे. महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात साधारण ३६ किलोमीटर आणि मध्य प्रदेशातील २०१ किलोमीटर अंतर मिळून तयार होणाऱ्या या महामार्गामुळे भुसावळ–चित्तोडगड दरम्यानचे अंतर साधारणपणे १५० किलोमीटरने कमी होण्याचा अंदाज आहे.

### ➤ रावेर तालुक्यास सर्वाधिक फायदा

भुसावळ–चित्तोडगड महामार्गामुळे शेतीमालाची वाहतूक जलद होईल, बाजारपेठा जवळ येतील आणि शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनाला योग्य दर मिळण्यास मदत होईल. विशेषतः महाराष्ट्रात जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्याला या महामार्गाचा मोठा फायदा होऊ शकतो. रावेर परिसरातील केळी, कापूस आणि इतर कृषी उत्पादनांची वाहतूक सुलभ होईल. स्थानिक उद्योगधंद्यांना चालना मिळेल, रोजगाराच्या संधी वाढतील. या भागाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत मिळेल. एकूणच भुसावळ–चित्तोडगड राष्ट्रीय महामार्ग आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक विकासाचा कणा ठरणार आहे. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या राज्यांमधील परस्पर संपर्क अधिक मजबूत होऊन दोन्ही राज्यांच्या सीमावर्ती भागांचा चेहरामोहरा बदलण्याची क्षमता या महामार्गात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये या प्रकल्पाबाबत मोठ्या अपेक्षा आणि आशा व्यक्त केल्या जात आहेत.

### चित्तोडगडचे अंतर कसे कमी होईल?

सद्यःस्थितीत भुसावळहून चित्तोडगड जाण्यासाठी बऱ्हाणपूर, इंदूर, नागदा, जावरा मार्गे तसेच यावल, चोपडा, शिरपूर, सेंधवा, रतलाम मार्गे जाणारे दोन स्वतंत्र महामार्ग उपलब्ध आहेत. पैकी बऱ्हाणपुरमार्गे चित्तोडगड जाण्यासाठी सुमारे ६०० किलोमीटरपेक्षा अधिक अंतराचा प्रवास करावा लागतो. दुसरीकडे चोपडा, शिरपुर, सेंधवामार्गे चित्तोडगड जाण्यासाठीही जवळपास तितकेच अंतर कापावे लागते. मात्र, पालसह बिस्तन, खरगोन, धारमार्गे नवीन महामार्ग तयार झाल्यावर भुसावळहून चित्तोडगड पर्यायाने पुष्कार आणि अजमेर बरेच जवळ येईल. फेऱ्याने प्रवास करण्याची वेळ येणार नसल्याने १३ ते १४ तासांचा प्रवास आठ ते नऊ तासांत पूर्ण होऊ शकेल, असे समजते.

### ➤ बऱ्हाणपूरहून खरगोन जाणेही सोयीचे

भुसावळ–चित्तोडगड हा प्रस्तावित राष्ट्रीय महामार्ग केवळ दोन शहरांना जोडणारा रस्ता नसून, तो महाराष्ट्र व मध्य प्रदेश या दोन राज्यांच्या विकासाला चालना देणारा महत्त्वाचा दळणवळण प्रकल्प ठरणार आहे. हा महामार्ग धारहून खरगोन, पाल, रावेर मार्गे थेट बऱ्हाणपूरपर्यंत जोडला जाणार असल्याने आजवर दुर्लक्षित राहिलेल्या अनेक भागांना विकासाची नवी दिशा मिळणार आहे. सध्याच्या परिस्थितीत बऱ्हाणपूरहून खरगोनकडे जाण्यासाठी थेट व सोयीस्कर असा मार्ग उपलब्ध नव्हता. नागरिकांना लांबचा व वेळखाऊ प्रवास करावा लागायचा. याचा परिणाम व्यापार, उद्योग, शिक्षण, आरोग्य सेवा तसेच दैनंदिन दळणवळणावरही होत असे. मात्र, भुसावळ–चित्तोडगड राष्ट्रीय महामार्ग अस्तित्वात आल्यानंतर ही अडचण दूर होणार आहे. बऱ्हाणपूर बायपास तयार झाल्यास वाहतूक कोंडी कमी होईल आणि लांब पल्ल्याचा प्रवास सुकर येईल.

## विद्यापीठात ९ रोजी राष्ट्रीय चर्चासत्र

प्रतिनिधी । जळगाव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास व संशोधन केंद्राच्या वतीने पी. एम. उषा कार्यक्रमांतर्गत 'साहित्यातील मानवतावाद' या विषयावर एकदिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे दि. ९ जानेवारी रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चासत्राचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यकार डॉ. जयप्रकाश कदम (माजी संचालक, केंद्रीय हिंदी प्रशिक्षण संस्था, गृह मंत्रालय, भारत सरकार) यांच्या हस्ते होणार असून ज्येष्ठ पत्रकार व नाट्यकर्मी ज्ञानेश महाराव यांचे बीजभाषण तर अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी भूषविणार आहेत.या चर्चासत्रात मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांमध्ये स्वतंत्र संशोधन पेपर वाचन सत्रांचे आयोजन करण्यात आले.

## पान १ वरुन

**अहिल्यानगरातून मनसेचे ,......**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराविरोधात निवडणुकीच्या मैदानात होता. निवडणूक प्रक्रियेलाच गालबोट लावणाऱ्या या प्रकारामुळे लोकशाहीला आव्हान दिले जात असल्याचा आरोप होत आहेत. पोलीस प्रशासन पुढील कारवाई काय करणार? याकडे संपूर्ण अहिल्यानगरचे लक्ष लागले आहे.

**शालेय शिक्षण विभागातील......**

सुरू झाली होती. त्यामुळे संघटनेने ऑगस्ट २०२५ मध्ये सामूहिक रजा व काम बंद आंदोलन सुरू केले होते. या अनुषंगाने शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे व प्रधान सचिव रणजीतसिंह देओल यांच्या समवेत संघटनेच्या पदाधिकारी शिष्टमंडळ यांची बैठकही त्यावेळी मंत्रालयात संपन्न झाली होती. त्या बैठकीमध्ये चौकशी शिवाय कोणालाही अटक होणार नाही तसेच केवळ एकत्रित वेतन देयका वर प्रतिस्वाक्षरी केली म्हणून अटक होणार नाही याबाबत काळजी घेतली जाईल व संघटनेचे निवेदन संबंधितांना पाठविण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी झालीच नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांकडून अटक सतराचा निषेध करत संताप व्यक्त करण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश विचारात घेता नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाने सुनावणीची संधी आणि दस्तऐवज सादर करण्यास पुरेसा कालावधी देऊन योग्य तो निर्णय घ्यावा. नियम, कायदे व नैसर्गिक न्यायाच्या तत्वांना डावलून होणाऱ्या पोलीस विभागाच्या कारवाया अधिकाऱ्यांचे मनोबल खच्चीकरण करणाऱ्या आहेत. आतापर्यंत अटक झालेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांना विभागाने त्यांची विभागीय चौकशी करून दोषी ठरविलेले नाही. त्यामुळे अधिका–यांकडून संतप्त भावना व्यक्त केल्या जात आहेत. संघटनेच्या मागण्या मान्य होई पर्यंत खाजगी शाळांच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा–यांच्या वेतन देयकावर प्रतिस्वाक्षरी न करण्याबाबत ठाम भूमिका अधिकाऱ्यांनी घेतली आहे.अखिल महाराष्ट्र राज्य शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेने विविध मागण्यांची दखल घेण्याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षणमंत्री, मुख्य सचिव, प्रधान सचिव, शिक्षण आयुक्त यांना पाठविले आहे.

**आसाम ठरले ८ वा वेतन......**

आयोग स्थापन केला असून, त्यानंतर कोणत्याही राज्याने अद्याप असा आयोग स्थापन केलेला नाही. या पार्श्वभूमीवर आसामचा निर्णय ऐतिहासिक असल्याचे सरमा यांनी म्हटले आहे. कर्मचाऱ्यांचे कल्याण आणि प्रगतिशील प्रशासनासाठी हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे त्यांनी सांगितले.

आसाम सरकारने यापूर्वी २०१५ मध्ये वेतन रचना, मानधन आणि सेवा अटींचा अभ्यास करण्यासाठी वेतन आयोग स्थापन केला होता. केंद्रीय आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी १ जानेवारी २०२६ पासून लागू होणार आहेत.

**राज्यात महायुतीचे १९......**

विजयी झाले असले तरी महापालिकेने अधिकृत निवडीची घोषणा केलेली नाही. शिंदेसेनेच्या तिघांच्या बिनविरोध विजयामुळे शिवसेनेचे शहरातील संघटनबळ अधोरेखित झाले असून आगामी महापालिका निवडणुकीत शिवसेना आक्रमक भूमिकेत असल्याचे संकेत मिळत आहेत. विजयानंतर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांनी जल्लोष करत आनंद व्यक्त केला. महापालिकेसमोर फटाके फोडून गुलाल उधळून घोषणा देत या यशाचे स्वागत करण्यात आले.

**सामाजिक न्याय विभागाचे......**

माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी भंडारा येथील आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला लेखी उत्तर देताना दिली. मात्र, थकीत रक्कम मिळेपर्यंत केंद्राकडून निधी मिळणार नसल्याने राज्य शासनाने तातडीने पाठपुरावा करावा, अशी मागणी होत आहे.

**नववर्षाच्या पहिल्याच दिवशी गॅस......**

किंमत आता प्रति सिलिंडर १,५३१.५० रुपयांवरून वाढून १,६४२.५० रुपये करण्यात आली आहे. ही दरवाढ दोन महिन्यांच्या दरकपातीनंतर झाली आहे. शेवटची दरकपात १ डिसेंबर २०२५ रोजी १९ किलोच्या सिलेंडरमागे १५.५० रुपये अशी करण्यात आली होती. त्यापूर्वी दर प्रति सिलेंडर ५ रुपयांनी कमी करण्यात आला होता. व्यावसायिक एलपीजीचे दर आता गेल्या वर्षी जूनपासूनच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचले आहेत. घरातील स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या घरगुती एलपीजीच्या किमती एप्रिल २०२५ मध्ये ५० रुपयांच्या वाढीनंतर, १४.२ किलोच्या सिलिंडरसाठी ८५३ रुपयांवर कायम राहिल्या आहेत.ताज्या दर कपातीनंतर विमानाच्या इंधनाचे दर मुंबईमध्ये हे दर किलोलिटरला ८६,३५२.१९ रुपयांपर्यंत, तर दिल्लीत आता हे दर किलोलिटरला ९२,३२३.०२ पर्यंत कमी झाले असल्याचे सरकारी तेल कंपन्यांनी स्पष्ट केले. या कपातीमुळे विमान कंपन्यांवरील ताण कमी होण्याची अपेक्षा आहे, कारण त्यांच्या परिचालन खर्चापैकी जवळपास ४० टक्के खर्च इंधनावर होतो. दरातील बदलाच्या परिणामाबद्दल विमान कंपन्यांकडून तात्काळ कोणतीही प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

## जळगाव प्रवासी सुरक्षा नोंदणी प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी बैठक

प्रतिनिधी । जळगाव



जिल्ह्यातील नागरिक वैयक्तिक कामे, देवदर्शन, पर्यटन, नोकरी वा शिक्षणासाठी जिल्ह्याबाहेर, राज्याबाहेर तसेच देशाबाहेर प्रवास करतात. अशा प्रवासादरम्यान अपघात, पूर, भूकंप, वादळ यासारख्या नैसर्गिक आपत्ती किंवा दहशतवादी हल्ले, अन्य अप्रिय घटनांमध्ये अडकण्याच्या घटना मागील काळात घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर प्रवाशांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीची व प्रभावी मदत मिळावी, या उद्देशाने जळगाव जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत 'जळगाव प्रवासी सुरक्षा नोंदणी' प्रकल्प राबविण्यात येत आहे.

जिल्हास्तरीय संबधित यंत्रणांची समन्वय बैठक जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. विविध आपत्ती जसे की पूर, अपघात, भूकंप, वादळ, युद्ध, दरड कोसळने इत्यादी आपत्ती ग्रस्त ठिकाणी नागरिक अडकलेले असतात. अशा वेळेस अशा अपघातग्रस्त नागरिकांचा शोध घेणे त्यांची आपत्तीग्रस्त भागातील स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून तात्पुरती निवास व्यवस्था, जखमी व गंभीर जखमी नागरिकांना उपचार सुविधा, ठिकाणावरून नागरिकांना सुरक्षितरीत्या रेल्वे विमान तसेच इतर वाहनांच्या माध्यमातून जिल्ह्यात परत आणणे जखमी व मृत लोकांना उपचाररानंतर जिल्ह्यात परत आणण्यासाठी अशा पर्यटक, भाविक, विद्यार्थी यांची नोंदणी होणे आवश्यक आहे, त्यासाठी जिल्ह्यातील सर्व पर्यटक, भाविक, प्रवासी यांनी जिल्ह्याबाहेर जाताना आपली नाव नोंदणी करूनच प्रवासात जावे.

जेणे करून जिल्हा प्रशासनाला तात्काळ प्रतिसाद मदत कार्य करणे सोपे जाईल व अशा आपदग्रस्त नागरिकांना व त्यांच्या नातेवाईकांना दिलासा मिळणे. हा ङ्गजळगाव प्रवासी सुरक्षा नोंदणीफ प्रकल्पचा उद्देश आहे. बैठकीत प्रवाशांची नोंदणी, माहिती अद्ययावत ठेवणे, आपत्तीच्या वेळी त्वरित संपर्क व मदत व्यवस्था याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

**➤ आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत जळगाव प्रवासी सुरक्षा नोंदणी प्रणाली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत सुरू करण्यात येणार आहे, यासाठी संबंधित विभागांचे नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येणार आहे.**

## विद्यापीठातील परिसर मुलाखतीत तीन विद्यार्थ्यांची झाली निवड

प्रतिनिधी । जळगाव



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष व युनिव्हर्सिटी इन्स्टिटयूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने बी.टेक. केमिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी दि. २२ डिसेंबर रोजी नवी मुंबई येथील नामांकित INOX Air Products Pvt. Ltd. या कंपनीसाठी झालेल्या परिसर मुलाखतीमध्ये हर्षल अनिल देवरे, नरेश जगन सुर्यवंशी व यश सुभाष तळेले या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

या निवड प्रक्रियेत विद्यापीठातील केमिकल इंजिनिअरिंग शाखेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत यश मिळवले आहे. विद्यापीठाच्या सातत्यपूर्ण प्रशिक्षण, उद्योगस्नेही अभ्यासक्रम व प्रभावी प्लेसमेंट धोरणामुळे विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये संधी मिळत असल्याची प्रतिक्रिया यावेळी विद्यार्थ्यांनी दिली आहे. या यशाबद्दल निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, युनिव्हर्सिटी इन्स्टिटयूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे संचालक प्रा. अजय गोस्वामी तसेच केमिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा. राजकुमार शिरसाम यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या परिसर मुलाखतीचे यशस्वी नियोजन व व्यवस्थापन केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. उज्वल डी. पाटील, उपसमन्वयक प्रा. रामेश्वर चव्हाण तसेच प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी केले.

## शिवसेनेचे डॉ.गौरव सोनवणे प्रभाग १८ अ मधून बिनविरोध

प्रतिनिधी । जळगाव




**शहर महानगरपालिकेच्या रणधुमाळीत भारतीय जनता पक्षानंतर आता शिवसेना (शिंदे गट) देखील आपला प्रभाव पाडताना दिसून येत आहे. प्रभाग क्रमांक १८ 'अ' मधून शिवसेनेचे अधिकृत उमेदवार डॉ. गौरव चंद्रकांत सोनवणे यांच्या विरोधातील एकमेव उमेदवाराने माघार घेतल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी हा विजय मिळाल्याने शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.**

चोपड्याचे आमदार प्रा.चंद्रकांतअण्णा सोनवणे आणि माजी आमदार लताताई सोनवणे यांचे सुपुत्र असलेले डॉ. गौरव सोनवणे यांच्या रूपाने आता महानगरपालिकेत एक तरुण, तडफदार आणि उच्चशिक्षित नेतृत्व दाखल झाले आहे. प्रभाग १८ 'अ' मध्ये शिवसेनेने त्यांना उमेदवारी जाहीर केली होती. त्यांच्या विरोधात अपक्ष उमेदवार मयूर चंद्रशेखर सोनवणे यांनी आपला अर्ज दाखल केला होता. छाननी प्रक्रियेत दोन्ही अर्ज वैध ठरले होते. त्यामुळे येथे निवडणूक होणार अशी चिन्हे होती.

मात्र, गुरुवारी (१ जानेवारी) अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी मयूर सोनवणे यांनी आपली माघार घेतल्याने डॉ. गौरव सोनवणे यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला. अधिकृत घोषणा होताच महानगरपालिकेच्या प्रांगणात शिवसेना कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी आणि गुलालाची उधळण करत जोरदार जल्लोष केला.

यावेळी जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, डॉ. अमृता सोनवणे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'शहराच्या विकासासाठी आणि प्रभागातील समस्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध राहील', असा विश्वास यावेळी डॉ.गौरव सोनवणे यांनी व्यक्त केला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (मोबा. – ७५८८८१३१३२) (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# बोटावरील शाई दाखवा सूट मिळवा

## धुळ्यात मतदान टक्क्यावर वाढीसाठी व्यापाऱ्यांचा पुढाकार

प्रतिनिधी । धुळे

**धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने शहरातील मतदानाची टक्केवारी वाढावी व जनजागृती व्हावी यासाठी शहरातील व्यापारी संस्थाप्रमुखांची बैठक आयुक्त तथा निवडणूक अधिकारी नितीन कापडणीस यांनी आज रोजी धुळे महानगरपालिकेत आयोजित केली होती.**



धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रक्रीयेने वेग घेतलेला असून धुळे मनपा क्षेत्रातील मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी विविध पातळीवर कार्यवाही करण्यात येत आहे. यात शालेय व महाविद्यालयीन विविध स्पर्धा, मतदान जनजागृती विषयक प्रभाग निहाय रॅली, होर्डींगच्या माध्यमातून शहरात जनजागृती दिव्यांग बांधवांना समक्ष भेटून मतदानाचे आवाहन इ. माध्यमातून जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

याच जनजागृती मोहीमेच्या उद्देशाने शहरातील व्यापारी बांधवांची बैठक आज रोजी आयुक्त तथा निवडूक अधिकारी नितीन कापडणीस यांनी आयोजित केलेली होती. यात मतदान वाढीसाठी अभिनव संकल्पनेद्वारे उपक्रम राबविण्याबाबत सूचीत करण्यात आले. मतदान केल्यावर हातावरील शाई दाखविल्यास त्या मतदाराला विशिष्ट काळासाठी खरेदीवर विशिष्ट सूट देण्यात यावी. व याप्रमाणे ज्या व्यापारी संस्था या राष्ट्रीय कार्यात सहभागी होण्यास संमती देतील अशा व्यापारी संस्थांची नावे महानगरपालिकेमार्फत जाहिररित्या प्रदर्शीत करण्यात येतील या संकल्पनेस उपस्थित व्यापारी बांधवांनी सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे.

**आज झालेल्या बैठकीस गोल्डन लिफ रिसॉर्ट, डीमार्ट प्रतिनिधी प्रशांत पवार, जुगल वस्त्रालय, हॉटेल गणपती पॅलेस, संगीता ड्रेसेस, तिरुपती सलून, रेलन क्लॉथ इ. व्यापारी संस्थांचे प्रतिनिधी तसेच धुळे मनपा उपायुक्त मनोज वाघ, वसुली अधिक्षक मुकेश अग्रवाल, शिक्षण मंडळ समन्वयक गणेश सुर्यवंशी आदी उपस्थिती होते.**

## कुरुकवाडेतील खाटू श्याम मंदिरात गर्दी

प्रतिनिधी । शिंदखेडा



**तालुक्यातील कुरुकवाडे येथील श्री खाटू श्याम मंदिरात आज ३१ डिसेंबर, वर्षाच्या शेवटच्या दिवशी भाविकांची मांदियाळी पाहायला मिळाली. आज एकादशी आणि वर्षाचा शेवटचा दिवस असा दुहेरी योग जुळून आल्याने सकाळपासूनच महिला व पुरुषांनी दर्शनासाठी एकच गर्दी केली आहे.**

जय श्री श्यामच्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला आहे. २०२५ वर्षाला निरोप देण्यासाठी आणि आगामी नवीन वर्षाची सुरुवात देवाच्या आशीर्वादाने करण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने कुरुकवाडे येथे दाखल झाले आहेत.

एकादशीचे औचित्य साधून उत्तर महाराष्ट्रातील विविध भागांतून भाविक येथे नतमस्तक होण्यासाठी येत आहेत. मंदिराबाहेर दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या असून, भक्तीमय वातावरणात भाविक शिस्तीने दर्शन घेत आहेत.

मंदिरात झालेली प्रचंड गर्दी लक्षात घेता, कुरुकवाडे गावातील स्थानिक ग्रामस्थ आणि तरुण मंडळांनी पुढाकार घेत व्यवस्थापनाची धुरा सांभाळली आहे. बाहेरगावाहून आलेल्या भाविकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी गावकऱ्यांकडून पिण्याचे पाणी, रांगेचे नियोजन आणि पार्किंग व्यवस्था सुरळीत करण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जात आहे.

गावकऱ्यांच्या या नियोजनामुळे भाविकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. सरत्या वर्षाला निरोप देताना, सर्व दुःख विसरून नवीन वर्षात सुख-समृद्धी लाभावी, अशी प्रार्थना भाविक श्री खाटू श्याम चरणी करत आहेत. रात्री उशिरापर्यंत ही गर्दी कायम राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## थोडक्यात

### नवापूर-विसरवाडी रस्त्यावर अपघातात तरुण ठार

**नंदुरबार ।** नवापुर ते विसरवाडी रोडवर अश्विन काथावाला यांच्या सॉमील समोरील पुलावर दोन मोटरसायकलींची समोरासमोर धडक होवून झालेल्या अपघातात तरुण ठार झाल्याची घटना घडली.दि.२० डिसेंबर रोजी सायंकाळी पावणे पाचच्या सुमारास मोटरसायकल (एमएच १२ क्युएच ४०६९) च्या चालकाने भरधाव वेगाने रस्त्याचे विरुध्द साईडने चालवून मोटरसायकल (क्र. एमएच ३९ एएफ २७१३) हिस समोरुन ठोस दिली. यात कुश अनिल वळवी (१९, रा. सावरट ता. नवापूर) याच्या चेहऱ्यावर गंभीर दुखापती होवून मरण पावला. याबाबत लव वळवी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नवापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार नितीन नाईक करीत आहेत.

### ५ जानेवारीला जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**नंदुरबार ।** जिल्हास्तरावर दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार ५ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या रंगावली सभागृहात आयोजित करण्यात आला आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे. जनतेच्या तक्रारी व गान्हाणी सोडविण्यासाठी दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरावर आणि पहिल्या सोमवारी जिल्हास्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

### वरखेडीच्या खाद्यजत्रेत खवय्यांची धूम

**धुळे ।** वरखेडी येथे गंगामाता विद्यालय व नगीनभाई रतन पटेल कनिष्ठ महाविद्यालयाने भरविलेल्या खाद्यजत्रेत अलोट गर्दी झाली होती. ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांनी लावलेल्या खाद्य स्टॉलवरील पदार्थ रोखीने घेत. त्याची चव चाखत मनमुराद आनंद लुटला. विद्यार्थ्यांनी पदार्थ बनविण्यापासून ते विक्रीतून आलेल्या कमाईची अनुभूती घेतली. त्यांनी केलेल्या खऱ्या कमाईचा आनंद अवर्णनीयच होता. धुळे तालुक्यातील वरखेडी येथील व नगाव एज्युकेशन सोसायटी संचलित गंगामाता विद्यालय व नगीनभाई रतन पटेल कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा गंगामाता आनंद मेळावा मोठ्या उत्साहात झाला. मेळाव्याचे प्राचार्य एस. बी. सोनवणे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

## धुळे - पुणे व्हाया मनमाड-दौंड एक्सप्रेस?

प्रतिनिधी । धुळे

**रोज सकाळी सुटणारी धुळे-मुंबई एक्सप्रेस रात्रीही नियमित करतानाच नव्याने धुळे-पुणे (मनमाड दौंड मार्गे) रेल्वे एक्सप्रेस गाडी सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिक, व्यापारी, विद्यार्थी आणि प्रवाशांकडून सातत्याने होत आहे. विशेषतः धुळे-मुंबई आणि धुळे-पुणे व्हाया मनमाड-दौंड या मार्गावर गाडी सुरू झाल्यास उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. सद्या धुळे रेल्वे स्थानकावरून मुंबईला जाण्यासाठी रोज सकाळी साडेसहा वाजेला धुळे -मुंबई ही एक्सप्रेस उपलब्ध आहे, अशीच एक्सप्रेस गाडी रात्री नियमित सुरु करावी अशी मागणी होते आहे.**

सध्या धुळे शहरातून मुंबई व पुण्याकडे रेल्वेने प्रवास करायचा म्हटले तर प्रवाशांना चाळीसगाव किंवा मनमाड येथे जावे लागते शिवाय या ठिकाणी स्थानकावर उतरून रेल्वे बदलावी लागते आहे. वृद्ध प्रवाशांना दादरा चढून संबंधित फलाटावर जावे लागते. त्यामुळे वेळ, खर्च आणि गैरसोयी वाढत असून धुळे पुणे ही स्वतंत्र थेट रेल्वेगाडी सुरू झाल्यास प्रवास अधिक सुलभ व सुरक्षित होणार आहे.

धुळे हे औद्योगिक, शैक्षणिक आणि व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे शहर असून दररोज मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक आणि रुग्ण मुंबई व पुण्याकडे प्रवास करतात.

या पार्श्वभूमीवर धुळे रेल्वे स्थानक प्रशासनाच्या वतीने रेल्वेसेवेचा प्रस्ताव तयार करून तो थेट रेल्वेच्या वरिष्ठ अधिकारी आणि केंद्रीय मंत्र्यांना पाठवावा अशी मागणी होते आहे. या प्रस्तावात धुळेमुंबई आणि धुळेपुणे व्हाया मनमाडदौंड या मार्गावरील प्रवासी क्षमतेची मागणी, संभाव्य वेळापत्रक, प्रवासी संख्येचा अंदाज तसेच या गाडीमुळे होणारे सामाजिक व आर्थिक फायदे यांचा सविस्तर उल्लेख करण्याची गरज व्यक्त होते आहे.



धुळे-मनमाड रेल्वेमार्ग विद्युतीकरण व पायाभूत सुविधांच्या दृष्टीने आता जवळपास सक्षम असल्याने या मार्गावरून थेट गाडी सुरू करणे व्यवहार्य ठरेल, अशी माहिती सूत्रांनी दिली.



## शहादा येथे मंदिर विश्वस्त, पदाधिकाऱ्यांची बैठक

### मंदिर न्यास समितीची कार्यकारिणी जाहीर, अध्यक्षपदी यशवंत चौधरी

प्रतिनिधी । शहादा

**शहादा शहर व परिसरातील मंदिर विश्वस्तांची आणि पदाधिकाऱ्यांची बैठक येथील गांधी हौसिंग सोसायटीचा सभागृहात संपन्न झाली. मंदिर न्यास समितीच्या अध्यक्षपदी यशवंत चौधरी उपाध्यक्षपदी राजेंद्र अग्रवाल तर सचिव पदी प्रा. गणेश सोनवणे यांची निवड करण्यात आली.**

मंदिरांच्या बाबतीत दिवसेंदिवस उद्भवणाऱ्या विविध व समस्या सोडविण्यासाठी या बैठकीचे आयोजन केले होते. प्रा. गणेश सोनवणे यांनी न्यास संरक्षण समिती का गरजेची आहे. याबाबत उद्देश समजावून सांगितला. त्यास उपस्थित सर्व मंदिर विश्वस्तांनी एकमुखाने मान्यता दिली. चर्चेत परिसरातील सर्व मंदिर विश्वस्त पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला. मंदिर न्यास संरक्षण समिती बनवण्याबद्दल एकमत झाले. मंदिर न्यास समितीच्या अध्यक्षपदी ऋणमुक्तेश्वर महादेव मंदिराचे प्रमुख यशवंत चौधरी, उपाध्यक्षपदी सप्तश्रृंगी मंदिर ट्रस्टचे प्रमुख राजेंद्र अग्रवाल आणि सचिव म्हणून म्हाळसा देवी मंदिराचे संस्थापक प्रा. गणेश सोनवणे, कोषाध्यक्ष किशोर पाटील, सहसचिव रोहन माळी, सदस्य पंकज भावसार, सुदाम सोनवणे, गणेश सोनवणे, चंद्रकांत चौधरी, शैलेंद्र पाटील, गोपीचंद बुलाणी, नरेंद्र परदेशी तर कायदेशीर सल्लागार अॅड. सुमंत जोशी यांची निवड करण्यात आली. बैठकीला शशीकांत पाटील, नितीन सोनवणे, हिरालाल न्हावी, लक्ष्मण बोरदेकर, महेश ठाराणी, पं. मदनलालजी शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती.

## महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे ईकर शेखची निवड

प्रतिनिधी । नवापूर

**महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित १९ वर्षाआतील मुलींच्या क्रिकेट स्पर्धेसाठी दि एन. डी. अॅड एम. वाय. सार्वजनिक हायस्कूल व शेठ एच.जे. शाह कनिष्ठ महाविद्यालयाची खेळाडू ईकरा आरिफ शेख हिची निवड झाली आहे.**



सदर स्पर्धेचे आयोजन सोलापूर येथे दि. २९ डिसेंबर ते ४ जानेवारी दरम्यान करण्यात आले असून या स्पर्धेत नंदुरबार जिल्ह्याचा संघ सहभागी होणार आहे. नंदुरबार जिल्ह्याच्या संघामध्ये दि. एन. डी. अँड एम. वाय. सार्वजनिक हायस्कूल व शेठ एच.जे. शाह कनिष्ठ महाविद्यालयाची खेळाडू कु. ईकरा आरिफ शेख हिची निवड झाल्याने शाळेच्या क्रीडा क्षेत्रात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिच्या या यशामागे शाळेचे क्रीडा शिक्षक श्रीकांत पाटील व निलेश गावंडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. तिच्या या उल्लेखनीय निवडीबद्दल दि. नवापूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विपिनभाई चोखावाला, उपाध्यक्ष शिरीष शाह, कार्याध्यक्षा श्रीमती शितलबेन वाणी, सचिव राजेंद्र अग्रवाल, सहसचिव शोएबभाई मांदा, कोषाध्यक्ष सतीश शाह मुख्याध्यापक संजयकुमार जाधव, उपमुख्याध्यापिका श्रीमती कमलबेन परिख, उपप्राचार्य नरेंद्र पाटील, पर्यवेक्षिका श्रीमती निर्जलाबेन सोनवणे व पर्यवेक्षक जाहीद खान पठाण यांनी ईकरा आरिफ शेखचे अभिनंदन केले.

## स्टेट बँकेचे एटीएम उखडून चोरीचा प्रयत्न

प्रतिनिधी । शिंदखेडा

**शहरातील शिरपूर रोडवरील स्टेट बँकेच्या मुख्य शाखेतील एटीएम फोडून मशीनच पळवून नेण्याचा चोरट्यांचा प्रयत्न पोलिसांच्या सतर्कतेमुळे अयशस्वी ठरला.**

आज पहाटे अडीच वाजेच्या सुमारास घडलेल्या या घटनेत चोरट्यांनी संपूर्ण एटीएम मशीन उखडून वाहनात टाकण्याचा प्रयत्न केला; मात्र वेळेत पोहोचलेल्या पोलिसांमुळे त्यांना एटीएम घटनास्थळीच टाकून पळ काढावा लागला. या एटीएममधील सुमारे ९ लाख ६९ हजार रुपयांची रक्कम सुरक्षित राहिली आहे. एसआयएस सिक्युरिटी कॅश मॅनेजमेंट सिस्टीम या कंपनीच्या गुरगाव येथील नियंत्रण कक्षातून एटीएममध्ये छेडछाड सुरू असल्याचा अलर्ट प्राप्त होताच शिंदखेडा पोलिसांना तत्काळ माहिती देण्यात आली. रात्र गस्तीवर असलेले पोलिस पथक घटनास्थळाच्या जवळच असल्याने अवघ्या ४ ते ५ मिनिटांत पोलिस एटीएम परिसरात दाखल झाले. पोलिसांची चाहूल लागताच चोरीचा प्रयत्न करणारे इसम घाईघाईने एटीएम मशीन सोडून पसार झाले. प्राथमिक तपासात चोरट्यांनी ब्लॅक रंगाची बोलेरो पिकअप व्हॅन वापरल्याचे निष्पन्न झाले आहे. दोरीच्या सहाय्याने एटीएम मशीन वाहनाला बांधून ते उखडून बाहेर काढण्यात आले होते. मात्र एटीएमचा आकार आणि वजन अधिक असल्याने ते वाहनात बसवता आले नाही. एटीएम बँकेच्या पायरी जवळच पडून राहिले. पोलिस देखील दाखल झाल्याने चोरट्यांनी पलायन केले. पोलिसांकडून चोरट्यांचा छडा लागेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## बोरीनदीवरील मांडळ पुलाच्या कामात प्रगती : माजी आ. कुणाल पाटील

### धुळे आणि मालेगाव अशा दोन तालुक्यांना जोडणारा हा महत्त्वाचा ठरेल पूल

प्रतिनिधी । धुळे

**धुळे तालुक्यातील मांडळजवळील बोरी नदीवर होणाऱ्या पुलाच्या कामाची आ. कुणाल पाटील यांनी पहाणी केली. या पुलाचे काम प्रगतीपथावर असून लवकरच शेतकरी, ग्रामस्थ व वाहनधारकांची गैरसोय दूर होणार असून धुळे आणि मालेगाव अशा दोन तालुक्यांना जोडणारा हा महत्वाचा पूल असल्याचे माजी आ. पाटील यांनी यावेळी सांगितले. मांडळ गावाजवळ बोरी नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम सुरु आहे.**



- मांडळ गावाजवळ होणारा पुल हा धुळे आणि मालेगाव तालुक्याला जोडणारा महत्वाचा पुल आहे. धुळे तालुक्यातील शिरुड परीसरातील गावे तसेच मांडळ, होरपाडा, कुळथे आणि मालेगाव तालुक्यातील गावांच्या वाहतूकीच्या व दळणवळणाच्या दृष्टीने सोयीस्कर आहे. त्यातून वेळ व पैसा वाचणार आहे. त्याप्रमाणे पावसाळ्यात शेतकऱ्यांची होणारी गैरसोय दूर होणार आहे.

या नदीवर पुल व्हावा, अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून येथील राहिवाशांची होती. या पुलाचे बांधकामासाठी निधी मंजुर करण्यात यावा, यासाठी माजी. आ. कुणाल पाटील यांच्याकडे ग्रामस्थांनी मागणी केली होती. बोरी नदीवरील या पुलाचे काम प्रगतीपथात आहे. या पुलाच्या कामाची माजी. आ. कुणाल पाटील यांनी पहाणी केली. यावेळी माहिती देतांना त्यांनी सांगितले की, बोरी नदीवरील या पुलास दि.४ डिसेंबर २०२३ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली असून पुलाच्या कामासाठी सुमारे ६.५० लक्ष रुपयाचा निधी मंजुर करण्यात आला आहे. बोरी नदीवर अनेक ठिकाणी पुलांची उभारणी केली आहे. या आधी पुल नसल्याने पावसाळ्यात शेतकरी व वाहनधारकांना कसरत करावी लागत असे, दुर्दैवाने महापूरात प्राणहानीही झाली आहे. त्यामुळे धुळे तालुक्यात बोरी नदीवर पुलांची साखळी निर्माण केली आहे. यावेळी बाजार समितीचे सभापती साहेबराव खैरनार, माजी सभापती बाजीराव पाटील, पं.स.चे माजी सभापती भगवान गर्दे, ज्येष्ठ नेते प्रा. छबू पाटील, खरेदी विक्री चेअरमन लहू पाटील, संचालक भगवान पाटील, उपसभापती नानासाहेब पाटील, माजी उपसभापती योगेश पाटील, जिल्हा भाजपा सदस्य तथा खरेदी विक्रीचे संचालक बापू खैरनार, माजी जि.प. सदस्य अरुण पाटील, संचालक विशाल सैंदाणे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस पंढरीनाथ पाटील, सरपंच तथा बाजार समितीच्या संचालक नयना पाटील आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यात बाल सुरक्षेच्या क्षेत्रात मोठी प्रगती; २५० बालविवाह रोखले

## ६७ मुले व मुली मानवी तस्करीतून वाचवली

प्रतिनिधी । अमळनेर

**दृष्टीने कारण आधार बहुउद्देशीय संस्था अमळनेर या संस्थेने जिल्हा प्रशासन, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा आणि समुदाय नेते यांच्या घनिष्ठ समन्वयातून एकूण ३१७ मुलांना वर्षभरात वाचवले. यापैकी २५० मुलांना बालविवाहापासून तर ६७ मुलांना मानवी तस्करीपासून वाचवण्यात आले. तस्करीतून वाचवलेल्या मुलांपैकी ३३ मुली आणि ३४ मुले होती.**

आधार बहुउद्देशीय संस्था ही या प्रकल्पात देशातील सर्वात मोठ्या बालसंरक्षण नेटवर्कची भागीदार संस्था असून, देशभरातील ४५१ जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या २५० पेक्षा अधिक संस्थांचे हे नेटवर्क बालहक्कांचे संरक्षण आणि मुलांवरील गुन्हे रोखण्यासाठी काम करते. प्रतिबंध, संरक्षण आणि न्यायालयीन कारवाई या ३ मॉडेलवर कार्यरत या नेटवर्कने जानेवारी २०२५ पासून आजपर्यंत देशभरात आणि ५५ हजार १४६ मुलांना मानवी तस्करीतून वाचवले आहेत. यापैकी ४० हजार ८३० मुले आणि १४ हजार ३१६ मुली होत्या. बालतस्करीच्या एकूण ४२ हजार २१७ प्रकरणांवर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली. संयुक्त कृतीच्या परिणामाबद्दल बोलताना आधार संस्था अध्यक्ष डॉ. भारती पाटील व संचालक रेणू प्रसाद यांनी सांगितले, बालसंरक्षणाच्या दृष्टीने २०२५ हे वर्ष आमच्यासाठी मैलाचा दगड ठरले आहे.

देशभरातील भागीदार संस्थांबरोबर मिळून ही संस्था २०३० पर्यंत बालविवाह



निर्मूलन, बालमजुरीतून मुलांची सुटका आणि वेगवेगळ्या जिल्ह्यांतील ,राज्यांमधील मजुरी, विवाह आणि देहव्यापारासाठी होणाऱ्या बालतस्करीची प्रकरणे ओळखून त्यावर कार्यवाही करण्यासाठी प्रयत्नशील आहे. हे नेटवर्क रेल्वे संरक्षण दलासह विविध कायद्याची अंमलबजावणी करणारे आहे.

जिल्हा प्रशासन, पोलिस, ग्रामपंचायती आणि शिक्षक यांच्यासोबत जवळून कार्य केल्यामुळे जमिनीवर स्पष्ट बदल दिसत आहेत. जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय आणि पोलीस यंत्रणेचा या प्रकल्पात संवेदनशील सहभाग असून त्यांच्या सक्रियतेमुळेच हे शक्य झाले आहे. भारत या १०० दिवसीय मोहिमेत समन्वयाने काम जळगाव जिल्हा प्रशासनाच्या बाल विवाह मुक्त करताना संस्थेने विवाह सोहळ्यांमध्ये सेवा देणारे केटरर, तंबू पुरवठादार, टेलर्स आदी घटकांशी संपर्क साधून बालविवाह रोखण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

## पारोळा येथे सानेगुरुजी जयंती साजरी

**पारोळा ।** येथील सानेगुरुजी प्राथमिक शाळेत पू. सानेगुरुजी यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक भैय्यासाहेब पवार उपस्थित होते. कार्यक्रम ाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती सी. जे. पाटील यांनी केले. पूज्य सानेगुरुजी जयंतीनिमित्त शाळेतील ४ थी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन सानेगुरुजींच्या जीवनचरित्रावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणातून मुख्याध्यापक भैयासाहेब पवार यांनी सानेगुरुजीची तळमळ त्यांना समाजाबद्दल आस्था आणि गुरुजींना आवडणारी मूले या मुदयातून आपले विचार व्यक्त केले.

## चाळीसगाव येथे लोकनियुक्त नगराध्यक्षा प्रतिभा चव्हाण यांनी स्वीकारला पदभार

प्रतिनिधी । चाळीसगाव

**येथील नगरपरिषदेत भाजपाच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा प्रतिभाताई मंगेश चव्हाण यांचा पदग्रहण सोहळा दि.३१ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.**

या कार्यक्रमास आमदार मंगेश चव्हाण, मुख्याधिकारी सौरभ जोशी यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक, भारतीय जनता पक्षाचे आजी माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी आ. मंगेश चव्हाण यांनी मनोगतात नगराध्यक्षा व नवनिर्वाचित नगरसेवकांना शुभेच्छा देत, विजयाचे यश डोक्यात न जाऊ देता पुढील पाच वर्षे अविरत लोकसेवा करावी, जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे व विकासाभिमुख कामे करावीत, असा सदेश दिला. याप्रसंगी सौ. प्रतिभाताई चव्हाण म्हणाल्या की, १०६ वर्षांची परंपरा असलेल्या चाळीसगाव नगरपालिकेत सर्वसाधारण प्रवर्गातून निवडून आलेली प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा होण्याचा मान चाळीसगावकरांच्या आशीर्वादाने मला मिळाला आहे.

एका शेतकरी कुटुंबातून आलेली चाळीसगावची लेक व सून शहराची प्रथम नागरिक बनली, ही बाब माझ्यासाठी अभिमानासोबतच मोठी जबाबदारीची आहे.

## थोडक्यात

### राज्यस्तरीय तापी-पूर्णा आदर्श शिक्षक पुरस्काराने ज्ञानेश्वर मोझे सन्मानित

**बोदवड ।** शिवचरण उज्जैनकर फाऊंडेशन मुक्ताईनगर आयोजित राज्यस्तरीय तापी-पूर्णा आदर्श शिक्षक पुरस्काराने बोदवड तालुक्यातील शेलवड येथील बहुउद्देशीय माध्यमिक विद्यालयातील कलाध्यापक व ज.जि.पू.वि.माध्यमिक शिक्षक, शिक्षकेतर पतपेढी मर्या. भुसावळचे संचालक तसेच जळगाव जिल्हा कलाध्यापक संघाचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे यांना 'आई मला जन्म घेऊ दे' या प्रसिद्ध अशा कवितेचे कवी प्रा. वा. ना. आंधळे यांच्या हस्ते व सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी शिवचरण उज्जैनकर व राज्यस्तरावरील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. ज्ञानेश्वर मोझे यांचे संस्थाचालक मुख्याध्यापक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व मित्रपरिवार व ग्रामस्थांनी अभिनंदन केले. सूत्रसंचलन श्रीमती राणे यांनी केले. यावेळी राज्यभरातील शिक्षक उपस्थित होते.

### धनाजी नाना महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**फैजपूर ।** येथील धनाजी नाना महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने धनाजी नाना चौधरी यांच्या पुण्यतिथीनिमित्त नुकतेच रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिरास प्रमुख म्हणून फैजपूर तापी परिसर विद्या मंडळाचे अध्यक्ष शिरीष मधुकरराव चौधरी, लिलाधर चौधरी, डॉ.एस. के. चौधरी, डॉ. एम. टी. फिरके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.बी. वाघुळदे तसेच एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सतीश पाटील उपस्थित होते. रक्तदान शिबिरात न्हावी येथील ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. सौरभ ढोले, जळगाव जिल्हा रुग्णालयाचे डॉ. मिनू व आयसीटीसी सेंटर येथील समुपदेशक मनोज चव्हाण यांचे सहकार्य लाभले.

## पाचोरा-भडगाव दिव्यांग हक्क व अधिकार यावर मार्गदर्शन कार्यक्रम



प्रतिनिधी । पाचोरा

**येथील पाचोरा तालुका विधी सेवा समिती व रोटरी क्लब पाचोरा भडगाव यांनी गो से हायस्कुल येथे विद्यार्थ्यांना दिव्यांग दिनानिमित्त मार्गदर्शन तसेच पोकसो कायदा, पर्यावरणविषयक साक्षरता तसेच वृक्षारोपण जनजागृती यावर मार्गदर्शन पर कार्यक्रम आयोजित केला होता.**

यावेळी मंचावर पाचोरा तालुका विधी सेवा समिती तसेच रोटरी क्लब पाचोरा भडगाव यांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना प्रा ऍड वैशाली ताई बोरकर यांनी दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांगांचे हक्क व अधिकार यावर मार्गदर्शन केले. त्यांनी स्वतः विद्यार्थ्यांना शपथ दिली की आज पासून माझ्या शाळेत माझ्या आ सपास कोणी ही दिव्यांग किंवा कोणतीही अपंगत्व असलेली व्यक्ती असेल तर तिला मदत करेन. यावेळी अ‍ॅड मालखेडे यांनी शासनाच्या विविध योजना तर ऍड सोनावणे यांनी पोकसो कायदा यावर मार्गदर्शन केले. प्रा विसपुते सर यांनी पर्यावरण, वृक्षारोपण जनजागृती यावर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली. रोटरी क्लब पाचोरा भडगावचे अध्यक्ष डॉ मुकेश तेली यांनी विदयार्थ्यांचे मूलभूत हक्क, अधिकार तसेच रोटरीचे पोलिओ निर्मूलनसोबत सेवाभावी कार्याचा आढावा सांगितला. यावेळी रोटरी क्लबचे सचिव डॉ अजयसिंग परदेशी, डॉ सिद्धांत तेली, प्रा डॉ पंकज शिंदे, संजय कोतकर, भरत सिनकर तसेच वरिष्ठ शिक्षक बी बी कुमावत सर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उज्वल पाटील यांनी तर आभार के एस अहिरराव सर यांनी केले. या कार्यक्रमासाठी अनमोल सहकार्य पर्यवेक्षक एल एस पाटील, प्रदीप पाटील, प्रशांत नैनाव यांचे लाभले. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

## जामनेर तालुक्यातील २२ रुग्णांवर मोतीबिंदूच्या यशस्वी शस्त्रक्रिया

प्रतिनिधी । जामनेर

**येथील गिरीश महाजन वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून जामनेर तालुक्यातील २२ रुग्णांवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना आवश्यक औषधोपचार देण्यात आले असून पुढील काळजी कशी घ्यावी याबाबत सविस्तर मार्गदर्शनही करण्यात आले.**



जामनेर तालुक्यातील काही गरजू रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची आवश्यकता होती. याची दखल घेत मंत्री गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली गिरीश महाजन वैद्यकीय सहायता कक्षाचे समन्वयक शिवाजी रामदास पाटील यांनी संबंधित रुग्णांना शासकीय वैद्यकीय माध्यमिक रुग्णालय, जळगाव येथे दाखल करून घेतले. रुग्णांची प्राथमिक व आवश्यक वैद्यकीय तपासणी करून त्यानंतर मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या.

या शस्त्रक्रिया डॉ. प्रवीण पाटील, डॉ. मयुरी राठोड, डॉ. प्रियंका पाटील, डॉ. विवेक सोलंकी, डॉ. मयुरेश डोंगरे आदी तज्ज्ञ डॉक्टरांनी केल्या. त्यांना परिचारिका सुनिता वक्ते, भाग्यश्री ढाकणे, वैष्णवी डांदगे, हिरा पालवी यांनी सहकार्य केले. संपूर्ण उपचार प्रक्रियेस अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. स्वप्नील सांगळे यांचे मार्गदर्शन लाभले. गरजू रुग्णांना वेळेत उपचार मिळाल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले.

## सिध्दार्थ गजरे यांचे अभियांत्रिकी सेवा परीक्षेत यश

प्रतिनिधी । रावेर

येथील मूळ रहिवासी तथा एल.आय. सी.चे विकास अधिकारी दिवंगत चंद्रमणी गजरे व कमलाबाई अग्रवाल गर्ल्स हायस्कूलच्या उपमुख्याध्यापिका जिजाबाई यांचे सुपुत्र तसेच रावेर ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश्वरी यांचे कनिष्ठ बंधू सिद्धार्थ गजरे यांनी नुकत्याच पार पडलेल्या यु.पी.एस.सी. (अभियांत्रिकी सेवा परीक्षा-मध्ये अभियांत्रिकी शाखेत भारतामध्ये ५० वा रँक मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.

## शिक्षणातून माणूस घडला पाहिजे : लवटे




प्रतिनिधी । चोपडा

**शिक्षणातून माणूस घडला पाहिजे असे प्रतिपादन डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी चोपडा येथे विवेकानंद प्रतिष्ठान व संशोधन केंद्र चोपडा संचालित विवेकानंद विद्यालयात आयोजित शिक्षण चिंतन परिषदेत केले.**

यावेळी व्यासपीठावर माजी विधानसभा अध्यक्ष अरुणभाई गुजराथी,संस्थेचे अध्यक्ष डॉ.विकासकाका हरताळकर, उपाध्यक्ष घनश्याम अग्रवाल, सचिव ड रवींद्र जैन, सहसचिव डॉ.विनीत हरताळकर,डॉ जयंत पाटील,माधुरी मयुर, चंद्रहासभाई गुजराथी, मुख्याध्यापक नरेंद्र भावे सर,डॉ.नीता हरताळकर,डॉ. अमित हरताळकर, आशा चित्ते , रेवती दिक्षित, पी.सी. पाटील यांची उपस्थिती होती.

पुढे बोलतांना डॉ.श्री.लवटे म्हणाले की, शिक्षण नावाची संस्था संस्कारशील असेल तर माणूस संस्कारमय होतो.चांगले शिक्षक मिळाले म्हणजे माणूस चांगला होतो.शिक्षण चांगले होण्यासाठी शिक्षण व्यवस्था निर्माण झाली. आता मात्र हळूहळू शिक्षण व्यवस्था ही खिळखिळी झाली असल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली.आणीबाणीचा अपवाद सोडला तर इंदिरा गांधी कर्तृत्ववान पंतप्रधान होत्या. पुरुष नव्हे तर स्त्री देखील कर्तृत्वान असते हे त्यांनी पंतप्रधान असतांना दाखवून दिले.गांधी पासून ते मोदी पर्यंत पंतप्रधान यांनी देश हिताचेच कामं केली. महात्मा गांधींचा प्रभाव आजही शिक्षणावर आहे.शिक्षण माणसाला बोध देते.शिक्षण काय देतं तर जीवनाला आकार देत.शिक्षण काय देतं तर जीवनाला आकार देत,आणि आज तेच नेमकं मिळत नाही असेही डॉ.श्री लवटे यांनी बोलतांना सांगितले.

आज विद्यालयात मुले प्रवेश नाही घेत तर पालक प्रवेश घेतात. शिक्षण व्यवस्था आज टक्केवारीवर आल्याने गोंधळ उडाला आहे. मुले नापास झाली पाहिजेत,नापास होणारे मोठे होतात हा इतिहास आहे.कारण ठेच लागल्यानंतर माणूस घडतो. आज वर्तमानात शिक्षण सगळ्यात महाग आहे.

> **आज स्पर्धा परीक्षेकडे मुले जास्त जातांना दिसतात. शिक्षक होण्यासाठी पुढे येत नाहीत. त्याचे कारण म्हणजे आज शिक्षण संस्था बदलल्या आहेत. शिक्षक भरतीसाठी २५ लाख द्यावे लागतात म्हणून मुले स्पर्धा परीक्षेकडे वळताना दिसतात. ब्रिटिश गेले पण आपल्याकडे काय काय ठेवून गेले हे न सांगितलेले बरे. मुलांना माणूस बनवा घोडा नाही.आश्वासन द्यायचे व पाळायचे नाही हे आपल्या देशाचे वैशिष्ट्य आहे.**

## भोई समाज सभागृहाची अनेक दशकाची मागणी पूर्ण केल्याचे समाधान : आ.जावळे

प्रतिनिधी । यावल

**तालुक्यातील पाडळसे येथील भोई समाजाची विविध सामाजिक कार्यक्रम तसेच विवाह सोहळा आयोजनासाठी सामाजिक सभागृहाची मागणी वेळोवेळी पुढे येत होती.**



यासाठी अनेक वर्षांपासून भोई समाज बांधव हे विविध लोकप्रतिनिधींकडे मागणी करत होते. हीच मागणी धरून पाडळसे येथील भोई समाज बांधवांनी रावेर-यावल विधानसभा क्षेत्राचे आमदार अमोल जावळे यांच्याकडे सामाजिक सभागृहाची मागणी केली आणि मागणीची तत्काळ दाखल घेऊन आमदार अमोल जावळे यांनी त्यांच्या आमदार निधीमधून पाडळसे येथे सामाजिक सभागृह उभारण्यात येणार असून या सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन दि.२८ रोजी पार पडले.

यावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष हिरालाल चौधरी, भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष नारायण चौधरी, संजय गांधी निराधार अध्यक्ष विलास चौधरी, भाजपा यावल तालुका अध्यक्ष सागर कोळी, नितीन चौधरी, योगराज बऱ्हाटे, दीपक चौधरी, भाजपा तालुका सरचिटणीस भरत पाटील, सरचिटणीस ज्ञानेश्वर तायडे, ग्रा पं. सदस्या पूनम पाटील, हीना पाटील पाडळसे, सरपंच पती अ‍ॅड सूरज पाटील, पाडळसे सरपंच पती नितीन चौधरी, पाडळसे सरपंच रजनिकांत पाटील, पाडळसेचे माजी सरपंच खेमचंद कोळी, वनोली सरपंच पती बाळू पाटील, राजेंद्र सपकाळे, ग्रा पं. सदस्य प्रकाश पाटील, ग्रा पं. सदस्य किरण तायडे, मा. ग्रा. पं. सदस्य सुभाष भोई, रेल्वे आरपीएफ किशोर भोई, गोविदा भोई, सामाजिक कार्यकर्ते मनोज पाटील, भरत चौधरी, योगेश पाटील, कासवे येथील सामाजिक कार्यकर्ते नथ्थू सपकाळे, त्र्यंबक कुन्हाडे, रविंद्र भोई, सुपडू भोई, दशरथ भोई, गोपाल भोई, रविंद्र भोई, राहुल भोई, प्रमोद भोई, गिरीश भोई, रोशन भोई, शुभम भोई, राजू भोई, योगेश भोई, जितेंद्र भोई, हिरामण भोई, मधुकर भोई, कुणाल भोई यांच्यासह पाडळसे गावांसह परिसरातील बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुऱ्हा पानाचे येथील स्नेहमेळाव्यात तब्बल ४८ वर्षांनी एकत्र आले वृद्ध वर्गमित्र

### २५ वर्गमित्र परिवारासह उपस्थित : उतार वयात शालेय आठवणींना उजाळा : छात्रालयातील विद्यार्थी झाले भावुक

प्रतिनिधी । भुसावळ

**येथून जवळच असलेल्या कुन्हे पानाचे येथील राजाराम धोंडू माध्यमिक विद्यालय येथे तत्कालीन न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष १९७६-७७ मध्ये दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा वर्ग मंगळवार दि. ३० डिसेंबर रोजी पुन्हा भरला. माजी विद्यार्थी मेळाव्यानिमित्त जवळपास २५ वर्गमित्रांनी परिवारासह तब्बल ४८ वर्षांनंतर शालेय आठवणींना उजाळा दिला.**



मोंढाळे रस्त्यालगत जोगेश्वरी माता मंदिराजवळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सोशल मिडियाच्या माध्यमातून तसेच प्रत्यक्ष एकमेकांना भेटून शैक्षणिक वर्ष १९७६-७७ च्या इयत्ता दहावीच्या २५ वर्ग मित्रांनी पुढाकार घेऊन जवळपास वयाच्या ६५ वर्षात पदार्पण करणाऱ्या वृद्ध मित्रांनी स्नेहमेळावा घडवून आणला. शिक्षकांविषयी कृतज्ञता म्हणून शिक्षकांना गेटपासून सभामंडपापर्यंत गुरुजनांचे स्वागत करण्यात आले. दरम्यान सर्व वर्ग मित्र मैत्रिणींनी जोडीने सभामंडपात प्रवेश केला. छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने तसेच स्वागत गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जे शिक्षक व विद्यार्थी मयत झाले होते त्यांना श्रद्धांजली वाहिली. यानंतर माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित सर्व शिक्षकांना शाल, श्रीफळ, बुके देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. नंतर भाजी, पोळी, दाळ, भात, शिरा अशा स्नेहभोजनचा सर्वांनी आस्वाद घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शैक्षणिक वर्ष १९७६-७७ च्या इयत्ता दहावीच्या सर्व वर्ग मित्रांनी परिश्रम घेतले. माजी विद्यार्थ्यांकडून छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजारामशेठ बडगुजर यांच्या प्रतिमा भेट दिली. ग्रामविकास शिक्षण मंडळाचे अध्यक्ष एकनाथ बडगुजर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला.

## खान्देश साहित्य संघाच्या अमळनेर तालुकाध्यक्षपदी सुनीता पाटील

प्रतिनिधी । अमळनेर

खान्देश साहित्य संघाच्या अमळनेर तालुकाध्यक्षपदी कवियत्री तथा जिल्हा आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त सौ. सुनीता रत्नाकर पाटील तर तालुका सचिवपदी माध्यमिक शिक्षक गोपाल पोपट हडपे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खान्देश साहित्य संघाचे केंद्रिय अध्यक्ष प्रा.डॉ. सदाशिव सुर्यवंशी, जळगाव जिल्हाध्यक्ष शरद धनगर, जिल्हा सचिव उमेश काटे यांच्या स्वाक्षरीने या नूतन पदाधिकाऱ्यांची तीन वर्षाकरिता नियुक्ती करण्यात आली आहे. खान्देश साहित्य संघाची उर्वरित अमळनेर तालुका कार्यकारीणी याप्रमाणे कार्याध्यक्ष दत्तात्रय बारकु सोनवणे, उपाध्यक्ष शरद भिका पाटील, उपाध्यक्ष प्रतिभा रामचंद्र पाटील, सहसचिव रूपाली अरुण पाटील, ज्येष्ठ मार्गदर्शक- गोरख दगडू पाटील, राजेंद्र भिकन वाघ, कार्यवाह नूतन हिंमत पाटील, कार्यवाह-अशोक रघुनाथ पाटील, ज्येष्ठ महिला मार्गदर्शक छाया इसे, अनिता बोरसे, महिला संघटक - रेखा मराठे, भारती शिंदे, पुरुष संघटक - चंद्रकांत पाटील, विशाल देशमुख तर सदस्यपदी पुनम जगतराव साळुंखे, जयश्री पवार, मंगल विठ्ठल नागरे, रविंद्र सुकदेव पाटील, अनिल नथ्थु पाटील, विलास गोविंदा बिरारी, मनोज चिंतामण ठाकरे यांचा समावेश आहे.